नियमित दिवाणी दावा क्र. २१८/२०१४

## तुर्तातुर्त मनाई ताकीद अर्जावरील (नि.५) वरील आदेश.

आप्पासाहेब महार (वाघमारे ) व इतर विरुध्द बाबासाहेब पोळ.

वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द कायमस्वरुपी मनाई हुकूम होवून मिळणेसाठी व हक्कज्ञापन होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ३९ नियम १ व २ अन्वये, वादपत्रातील नमुद व वर्णन केलेल्या मिळकतीतील (यापुढे सदर मिळकतीस सोयीकरीता 'वादग्रस्त मिळकत' असे संबोधिण्यात येते.) वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी याने स्वतः अगर इतरांमार्फत हरकत अगर अडथळा करु नये आणि वादींना बेदखल करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय होईपावेतो त्याचेविरुध्द मिळणेसाठी सादर केलेला आहे.

३. वादपत्रातील व प्रस्तुत अर्जातील वादींचे थोडक्यात कथन असे आहे की, वादग्रस्त मिळकतीचा मुळ मालक सखाराम धोंडी पाटील हा असून, त्याने कधीही व केव्हाही शेती केलेली नव्हती आणि नाही. सदर मिळकतीत सन १९५५–१९५६ पूर्वीपासून वादींचे पूर्वहक्कदार हे कुळ होते. तशी नोंद सदर मिळकतीच्या ७/१२ पत्रकी इतर हक्कात सा.कु. म्हणून गंगाराम परसा महार व शिवाप्पा कृष्णा महार यांची कुळ म्हणून होती व कुळ या नात्याने ते जमीन कसत होते. वादग्रस्त मिळकतीचे मालक सखाराम याने सदर मिळकत नोंदणीकृत दस्त क्र.१२९६ दिनांक ३.१२.१९५६ रोजीच्या दस्तान्वये आक्काताई तात्या पाटील व ताराबाई गणपतराव पाटील यांना हयातीपर्यंत पोटगी म्हणून दिली होती. तशी नोंद ७/१२ पत्रकी झालेली आहे. ती नोंद चुकीची व बेकायदेशीर असून, पोटगीपत्राने कधीही व केव्हाही मालक होवू शकत नाहीत. सदर नोंद चुकीची व बेकायदेशीर असल्याकारणाने त्या विरोधात वादींनी आर.टी.एस. अपील दाखल केले आहे. वादींचे पूर्वहक्कदार हे 'कृषक दिन' कुळ होते. त्यामुळे वादींच्या पूर्वहक्कदारांना मिळकत खरेदी घेण्याचा हक्क होता. वर नमुद झालेली नोंद चुकीची व बेकायदेशीर असल्याचे माहित असून सुध्दा प्रतिवादीची बहीण आक्काताई पाटील हिच्याकडून बेकायदेशीररित्या दिनांक १९.६.१९७९ रोजी मृत्यूपत्र तयार केले आहे. तसे मृत्यूपत्र करुन देण्याचा आक्काताई हिस कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता. त्यामुळे ते मृत्यूपत्र बेकायदेशीर आहे. वास्तविक ताराबाई व आक्काताई हया केव्हाही वादग्रस्त मिळकत कसत नव्हत्या व नाहीत. पूर्वीपासून सदर मिळकतीत वादींच्या पूर्वी त्यांचे पूर्वहक्कदार व

त्यानंतर वादी हेच कुळ होते.

४. वादपत्रातील व अर्जातील वादींचे थोडक्यात पुढील वादकथन असे आहे की, प्रतिवादीने वादग्रस्त मिळकतीच्या पीकपहाणी सदरी नाव लागणेसंदर्भात दाखल केलेला वर्दी अर्ज गुणदोषावर नामंजूर झाला आहे. वादग्रस्त मिळकतीत वादींची कब्जेवहिवाट आहे. पीकपहाणी सदरी वादींच्या नावाची नोंद करणेसंदर्भात तहसिलदार यांनी आदेश केलेला आहे. तथापि; गावकामगार तलाठी यांचेवर प्रतिवादीचा राजकीय वरदहस्त असल्यामुळे पीकपहाणी सदरी वादींच्या नावाची नोंद करु दिलेली नाही. प्रतिवादीने सदर मिळकतीचा कब्जा मिळावा म्हणून दाखल केलेले इचलकरंजी येथील उप विभागीय अधिकारी यांच्या न्यायालयातील अपील नामंजूर झालेले आहे. त्याविरुध्द दाखल कलेले महाराष्ट्र महसूल न्यायाधीकरण यांच्या न्यायालयातील रिव्हीजन दिनांक २७.९.२०१३ रोजी नामंजूर झाले आहे. त्या निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेले रिट पिटीशन क्र.२७१/२०१४ हे देखील नामंजूर झाले आहे. सदर रिट पिटीशन मधील न्यायनिर्णयाविरुध्द दिल्ली येथे दाखल करण्यात आलेले स्पेशल लिव्ह पिटीशन अदयाप प्रलंबीत आहे. प्रतिवादी हा वादग्रस्त मिळकत तबदील करण्याची भाषा वापरत आहे. वादग्रस्त मिळकतीतील वादींचा कब्जा काढून घेणार असल्याची त्यांना भिती निर्माण झाली आहे. वादी हे सदर मिळकतीत सालोसाल ऊस , सोयाबीन, शेंग, भुईमुग अशी नगदी पिके घेत आहेत. दाव्याचा न्यायनिर्णय होण्यास बराच कालावधी जाणार आहे. वादींना सकृतदर्शनी केस असून, न्यायाचा समतोल त्यांच्या वतीने आहे. अर्ज नामंजूर करण्याने वादींचे अतोनात असे नुकसान होणार आहे. अर्ज मंजूर करण्याने प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी याने स्वतः अगर इतरांमार्फत हरकत अगर अडथळा करु नये आणि वादींना बेदखल करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय होईपावेतो देण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती वादींनी केली आहे.

५. प्रतिवादीस प्रस्तुत दाव्याच्या व अर्जाच्या समन्स/ नोटीसांची बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी याने त्याची कैफियत व म्हणणे नि. १२ वर सादर केली आहे.सदर कैफियतीतील प्रतिवादीची थोडक्यात कथने अशी आहेत की, दाव्यातील संपूर्ण मजकुर खोटा व चुकीचा असून, वादग्रस्त मिळकतीचे वर्णन चुकीचे आहे. वादग्रस्त मिळकतीबाबत कोणतेही प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित नाही. किंबहुना प्रतिवादीस त्याबाबत कसलीही नोटीस आजपावेतो आलेली नाही. सन २००३ पासून प्रतिवादीची सदर मिळकतीत अखंड व अव्याहतपणे शांततामय कब्जेवहिवाट असल्याने वादींना बेदखल

करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. दाव्याचा तपशील व आकारणी चुकीची आहे. वादींनी गट क्र.९८७ मधील दक्षिण बाजूच्या १/२ क्षेत्राबाबत याच न्यायालयात कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी नि.दि.दा.क्र.१६४/२०१४ हा दावा दाखल केला होता. त्यातील मागणी आणि प्रस्तुत दाव्यातील मागणी ही सारखीच आहे. त्यामुळे दाव्यास प्राङन्याय तत्वाची बाधा येते. प्रतिवादीस वादींनी वादग्रस्त मिळकतीचा कब्जा देण्याचा आदेश मा. उच्च न्यायालयाने कायम ठेवलेला आहे. प्रतिवादीस फेरफार क्र.४०४८ अन्वये वादग्रस्त मिळकतीची मिळालेली कब्जेपट्टी कायम झालेली आहे. कायदेशीर मार्गाने सदर मिळकतीचा प्रतिवादीस मिळालेला कब्जा मा. उच्च न्यायालयाच्या वेळोवेळीच्या निर्णयानुसार कायम झाला आहे. कोणत्याही सक्षम न्यायालयाने वादग्रस्त मिळकतीतील प्रतिवादीस दक्षिणेकडील हे.३.०४ आर. मिळकतीचा मिळालेला कब्जा रद्दबातल ठरविलेला नाही. खोटा व खोडसाळ दावा दाखल केल्याप्रकरणी वादींकडून प्रतिवादी हा १०,०००/- रुपये नुकसानभरपाई मिळण्यास पात्र होतो. न्यायाचा समतोल प्रतिवादीच्या बाजूने आहे. अर्ज मंजूर करण्याने प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. अर्ज नामंजूर करण्याने वादींचे कसलेही नुकसान होणार नाही. त्यामुळे दावा व अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची मागणी प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

६. वाद आणि प्रतिवाद कथनावरुन खालील मुद्दे माझ्या विचाराधीन उपस्थित झाले. ते मुद्दे आणि त्यावरील माझे निष्कर्ष सबळ कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादींना सकृतदर्शनी केस आहे काय ? | ... | नाही.. |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | ... | नाही. |
| ३. | तात्पुरता मनाई आदेश न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | ... | नाही. |
| ४. | अंतिम आदेश कोणता ? | ... | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## :: कारणमीमांसा ::

७. वादींनी वादपत्रातील व अर्जातील कथनांच्या पुष्ठयर्थ सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यादाखल; मौजे राजापूर येथील भूमापन गट क्र.९८७ या मिळकतीच्या ७/१२ उता–याची छायांकित प्रत, पोटगीपत्रक, नोंदणीकृत दस्त क्र.१२९६ याची प्रत, फेरफार क्र.९७१ च्या उता–याची छायांकित प्रत, आक्काताई तात्यासो पाटील हिने करवून दिलेल्या मृत्यूपत्राची प्रमाणित प्रत, फेरफार क्र.६१८ च्या उता–याची छायांकित प्रत, उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी यांच्या न्यायालयातील आर.टी.एस. अपीलाची छायांकित प्रत व दिनांक २८.७.२०१३ रोजीचे वटमुखत्यारपत्राची छायांकित प्रत इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत. प्रतिवादीने आपली बाजू सकृतदर्शनी शाबीत करण्यासाठी कोणताही कागद सादर केलेला नाही.

**मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता** :

८. मुद्दा क्र. १ ते ३ हे परस्परांशी निगडीत असल्याने; त्यांचे विवेचन न्यायाच्या दृष्टीकोनातून एकत्रितपणे करण्यात येत आहे. वादी व प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर वारंवार संधी मिळूनही अंतिम युक्तीवाद सादर केला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज उभय पक्षकारांच्या युक्तीवादाशिवाय चालविण्यात यावा असा आदेश निर्गमित झालेला आहे. प्रस्तुतचा अर्ज गुणवत्तेवर अंतिम निर्गतीसाठी विचारात घेण्यात आला आहे.

९. वाद–प्रतिवाद कथनांचे अवलोकन केले. प्रकरणातील प्राप्त झालेला सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा पहाता; वादग्रस्त मिळकतीचे वर्णन चुकीचे असल्याचे प्रतिवादीचे जरी प्रतिवादकथन असले तरीदेखील सदर मिळकतीचे खरे वर्णन काय आहे हे त्याने कैफियतीत दिलेले नाही. अशा परिस्थितीत वादग्रस्त मिळकतीचे वर्णन अचूक आहे असे सकृतदर्शनी अनुमान काढावे लागेल. वादग्रस्त मिळकतीत वादींचा दावा दाखल तारखेस कब्जा आहे काय हे पाहण्याकरीता सदर मिळकतीच्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता; सन २०१२-२०१३ या कालावधीत मिळकतीच्या 'भोगवटादाराचे नाव ' अथवा 'जमीन करणा-याचे नाव ' या सदरी वादींच्या नावाची नोंद असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. किंबहुना सदर मिळकतीच्या ' इतर अधिकार ' या सदरी सा.कु. या सदरी वादींच्या नावाभोवती कंस करण्यात आला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

१०. एकूणच प्राप्त झालेला सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा पहाता; वादग्रस्त मिळकतीत वादींचा शांततामय ताबा आहे हे प्रथमदर्शनी शाबीत करणेसाठी त्यांनी

कोणताही प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. वादग्रस्त मिळकतीच्या ७/१२ पत्रकी देखील वादींच्या नावाची नोंद झालेली सकृतदर्शनी दिसत नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी हा वादींना सदर मिळकतीतून बेदखल करीत असल्याचे वादकथन सकृतदर्शनी विश्वसनीय असल्याचे दिसून येत नाही. प्रस्तुतकामी वादींना प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसून येत नसून, न्यायाचा समतोलही त्यांच्या बाजूने असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादींनी मागितलेली तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी मंजूर करता येत नाही. त्यामुळे वरील संपूर्ण विवेचनावरुन मुद्दा क्रमांक १ ते ३ यांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतात.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करीता</u> :**

११. मुद्दा क्रमांक १ ते ३ यांच्या नकारार्थी निष्कर्षावरुन असे दिसून येते की, वादींनी त्यांची केस सकृतदर्शनी आहे हे शाबीत केलेले नाही. तसेच; न्यायाचा समतोल हा वादींपेक्षा प्रतिवादीच्या बाजूस असलेने, अर्जातील मागणी मंजूर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. करीता मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाच्या खर्चाबद्दल आदेश नाही.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

सही /-

दिनांक २९ ऑगष्ट,२०१५

( आर. आर. काळे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कुरुंदवाड.

I affirm that the contents of this P. D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S.K.Yadav, Stenographer (L.G.) |
| Name of the Court | Civil Court Jr. Dn., Kurundwad. |
| Date of Dictation | 29.08.2015 |
| Order signed by the P. O. on | 29.08.2015 |
| Order uploaded on | 03.09.2015 |